सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,

बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र. : तंशिविकापु/विवि-५/परीक्षा /म.लो.आ. / २०२३/ 5297 दिनांक : 16 NOV 2023

**परिपत्रक**

**परीक्षा प्राधान्य/अति महत्वाचे**

प्रति,

प्राचार्य / संचालक,

या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सोबत जोडलेल्या

यादीमध्ये नमूद असलेल्या सर्व संस्था (पुणे विभाग पुणे)

**विषय : महाराष्ट्र लोकसेवा आयोग पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय पूर्व परीक्षा २०२३ दि. ०२.१२.२०२३ च्या आयोजनाकरीता शाळा/महाविद्यालय उपलब्ध करुन देणेबाबत.**

**संदर्भ :** १) मा. जिल्हाधिकारी, (महसुल शाखा) जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचे पत्र क्र. पमईरजा/कावि/७४९/२०२३ पुणे दिनांक ०९.११.२०२३.

२) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र. एमएनजी-९२२/सीआर-१७/२०२३/तेरा, दि. २१.०९.२०२३ रोजीचे पत्र.

**उपरोक्त विषयाचे संदर्भाधीन पत्र वाचावे.**

उपरोक्त विषयाचे मा. जिल्हाधिकारी, महसुल शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचे प्राप्त पत्रानुसार कळविण्यात येते की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा **दिनांक ०२ डिसेंबर २०२३ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे** प्रस्तुत परीक्षेकरीता ६४५६/- उमेदवारांची बैठक व्यवस्था करणेकामी **दिनांक ०१ डिसेंबर २०२३ रोजी** बैठकव्यवस्था करणेकरीता व प्रत्यक्ष परीक्षा घेण्यासाठी महाविद्यालय उपलब्ध करुन देणेबाबत वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरीता महाविद्यालये उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून जारी करण्यात आलेल्या शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक मलोआ-१०१२/प्र.क्र. ९५/१२/आठ दिनांक ११ मे २०१२ तसेच शासन परिपत्रक , उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण – ११११/ (प्र.क्र.९/१५) समन्वय, दिनांक २८ जानेवारी २०१५ व शासन परिपत्रक, शालेय शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-१११७/प्र.क्र. ३८५/एसएस-१ दिनांक २१ फेब्रुवारी २०१८ च्या आदेशातील तरतुदीनुसार शाळा/ महाविद्यालये विभाग उपलब्ध करुन देण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

**त्याअनुषंगाने या विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या या परिपत्रकासोबत जोडलेल्या यादीमध्ये नमूद असलेल्या सर्व संस्थाप्रमुख यांना सूचित करण्यात येते की, सोबत जोडलेल्या पत्राच्या निर्देशानुसार दि. ०१ व दिनांक ०२ डिसेंबर २०२३ रोजी परीक्षा आयोजित केलेली आहे. तरी सदर महाविद्यालयावर आपले मार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षा दि. ०१ व ०२ डिसेंबर २०२३ वगळुन घेण्यात यावी. मा. जिल्हाधिकारी, महसुल शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचे पत्राचे अवलोकन करण्यात यावे** व त्यांनी दिलेल्या सूचनांची/निर्देशांची

काटेकोरपणे न - चुकता अंमलबजावणी करण्यात यावी. दिलेल्या सूचनांचे पालन न केल्यास त्यास संबंधीत संस्थाप्रमूख सर्वस्वी जबाबदार राहतील, व त्यांचेवर नियमानुसार यथोचित कार्यवाही करण्यात येईल.

सोबत - संदर्भीय पत्र.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे

## ( महसूल शाखा )

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२४८०४ Email : mahsulpune2@gmail.com

****************************************************************************************

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे. 16 NUV 2023 आवक क्र. ecE4

**परीक्षा प्राधान्य/ अति महत्वाचे**

क्र.पमईरजा/कावि/७४९/२०२३
दिनांक ०९ / ११ /२०२३

**प्रति,**

१. मा. कुलगुरु,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेश खिंड रोड पुणे

२. सहसंचालक, तंत्रशिक्षक विभागीय कार्यालय पुणे ४१२ ई, शिवाजीनगर पुणे

३. शिक्षणाधिकारी, (उच्च व माध्यमिक) जिल्हा परीषद पुणे.

**विषय-** महाराष्ट्र लोकसेवा आयोग पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय पूर्व परीक्षा २०२३ दि. ०२/१२/२०२३ च्या आयोजनाकरीता शाळा/ महाविद्यालय उपलब्ध करुन देण्याबाबत...

**संदर्भ:-** १) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडील पत्र क्र. एमएनजी-१२२/सीआर-१७/२०२३/तेरा दि. २१/०९/२०२३

२) या कार्यालयाकडील पत्र क्र. पमई रजा/ कावि/ ६११/२०२३, दिनांक १८/१०/२०२३

**महोदय,**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा पूर्व परीक्षा २०२३ दि. ०२ डिसेंबर २०२३ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. प्रस्तुत परीक्षेकरीता आयोगाकडून ६४५६/- उमेदवारांची बैठक व्यवस्था करणे कामी दिनांक ०१ डिसेंबर २०२३ रोजी बैठकव्यवस्था करणे करीता व दिनांक ०२ डिसेंबर २०२३ रोजी प्रत्यक्ष परीक्षा घेण्यासाठी शाळा/ महाविद्यालय उपलब्ध करुन देणे बाबत वरील संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये कळविलेले आहे.

आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरीता शाळा/ महाविद्यालये उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून जारी करण्यात आलेल्या शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक मलोआ-१०१२/प्र.क्र. ९५/१२/आठ दिनांक ११ मे २०१२ तसेच शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण- ११११/ (प्र.क्र.९/१५) समन्वय, दिनांक २८ जानेवारी २०१५ व शासन परिपत्रक, शालेय शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-१११७/प्र.क्र. ३८५/एसएस-१ दिनांक २१ फेब्रुवारी २०१८ च्या आदेशातील तरतुदीनुसार शाळा/ महाविद्यालये उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कृपया आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत कळविलेले आहे.

त्यानुसार या कार्यालयाकडील संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये दिनांक ०२ डिसेंबर २०२३ रोजी होणाऱ्या परीक्षेकरीता शाळा/महाविद्यालय अधिग्रहीत करण्यात आले असून त्याबाबत मा. महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांना कळविण्यात आले आहे. सोबत शाळा/महाविद्यालयांची यादी अवलोकनार्थ जोडली आहे.

**परंतु आयोगाने अंतिम केलेल्या काही महाविद्यालयांवर आपणामार्फत दि. ०१ व ०२ डिसेंबर २०२३ रोजी परीक्षा आयोजित केलेली आहे. तरी सदर महाविद्यालयावर आपले मार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षा दि. ०१ व ०२ डिसेंबर २०२३ वगळुन घेण्यात यावी, ही विनंती.**

जिल्हाधिकारी पुणे सत्यमेव जयते

आपला विश्वासू,

(डॉ. राजेश देशमुख)
जिल्हाधिकारी पुणे

प्रत :- मा. अवर सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, ५,७, व ८ मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षी कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ यांजकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

**MPSC SubCenter Capacity List**

Police Sub Inspector Limited Departmental Competitive Preliminary Examination 2023

Exam Date - 2 December, 2023

| Sr.No. | SubCenter Name | Capacity |
|---|---|---|
| | **Pune** | |
| 1 | LOKMANYA TILAK HIGH SCHOOL, SAPRAS, PURV KHADKI, PUNE 3 | 360 |
| 2 | LALBAHADUR SHASTRI HIGH SCHOOL, NEAR CANTONMENT HOSPITAL, KHADKI, PUNE-3 | 360 |
| 3 | PEOPLE EDUCATION SOCIETY'S DR.AMBEDKAR COLLEGE OF ARTS AND COMMERCE, JAI-JAWAN NAGAR, YERWADA, PUNE-411006 | 360 |
| 4 | D Y PATIL SCHOOL OF ENGINEERING, D Y PATIL KNOWLEDGE CITY, CHARHOLI BU. , VIA LOHGAON, LOHGAON, TA-HAVELI, PUNE | 480 |
| 5 | GENBA SOPANRAO TRUST PARVATIBAI GENBA MOZE COLLEGE OF ENGINEERING, S N 2181, WAGHOLI, TAL HAVELI, DIST PUNE | 480 |
| 6 | JSPM BHIVARABAI SAWANT POLYTECHNIC, S N 720, PUNE NAGAR ROAD, WAGHOLI, TA-HAVELI, DIST PUNE | 480 |
| 7 | JSPM BHIVARABAI SAWANT INSTITUTE OF TECHNOLOGY, S N 720, PUNE NAGAR ROAD, WAGHOLI, TA-HAVELI, DIST PUNE | 432 |
| 8 | IMPERIAL COLLEGE OF ENGINEERING REASERCH, S. NO. 720, PUNE NAGAR ROAD, WAGHOLI TQ. HAVELI, DIST. PUNE | 432 |
| 9 | TUKARAM DHONDIBA PATHARE ARTS, COMMERCE AND SCIENCE SENIOR COLLEGE, CHANDNAGAR, PUNE 14. | 432 |
| 10 | SINHAGAD TECHNICAL EDUCATION SOCIETY'S SOU. VENUTAI CHAVAN POLYTECHNIC, VADGAON, AMBEGAON, BUDRUK, OFF SINGHGAD ROAD, PUNE 11 | 360 |
| 11 | SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY AND SCIENCE, SURVEY NO. 49/1, NEAR SKN HOSPITAL, NARHE, PUNE-41 PART A | 432 |
| 12 | SINHGAD INSTITUTE OF TECHNOLOGY AND SCIENCE, SURVEY NO. 49/1, NEAR SKN HOSPITAL, NARHE, PUNE-41 PART B | 240 |
| 13 | SINHGAD INSTITUTE OF MANAGEMENT & COMPUTER APPLICATION, 49/1 NARHE TECHNICAL CAMPUS, NEAR S.K.N. HOSPITAL, OPP. BANK OF MAHARASHTRA, PUNE | 480 |
| 14 | PUNE JILHA SHIKSHAN MANDAL'S SHRI MHALASAKANT MADHYAMIK AND UCHHA MADHYAMIK VIDYALAYA, AKURDI, PUNE PART A | 360 |
| 15 | PUNE JILHA SHIKSHAN MANDAL'S SHRI MHALASAKANT MADHYAMIK AND UCHHA MADHYAMIK VIDYALAYA, AKURDI, PUNE PART B | 360 |
| 16 | LATE NAGNATH MARUTI GADSING (GURUJI) JUNIOR COLLEGE, KRISHNA NAGAR, CHINCHWAD, PUNE | 408 |
| | **Total** | **6456** |
| | Admitted | 6439 |